# प्रसिध्दी पत्रक

## श्रीमती सुनिता पोफळे, वय ५२ वर्ष, धंदा-परिरक्षन भुमापक, नगर भुमापन कार्यालय, औरंगाबाद ह्या ३,०००/- रुपयाची लाच स्विकारल्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळयात

| | | |
|---|---|---|
| आरोपीचे नांव हुद्दा व पत्ता | :- | **श्रीमती सुनिता सुदामराव पोफळे, वय ५२ वर्ष, धंदा-परिरक्षन भुमापक, नगर भुमापन कार्यालय, औरंगाबाद रा. प्लॉट नं १३७, परिजात नगर, एन-४ सिडको, औरंगाबाद** |
| गुन्हा घडला तारीख व ठिकाण | :- | दिनांक १७/०७/२०१८ रोजी नगर भुमापन कार्यालय, औरंगाबाद येथील कार्यालयात |
| लाचेची रक्कम | :- | ३,०००/- रुपये |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांना घराचा फेरफार उतारा देण्यासाठी |

यातील तक्रारदार ह्या घरकाम करतात, त्यांची आई मयत झाल्याने त्यांच्या आईच्या नावावर असलेले घर फेरफारवरुन आईचे नाव कमी करुन तक्रारदारासह त्यांच्या दोन्ही बहिणींची नावे फेरफार उता-यावर नोंदवुन मिळण्यासाठी नगर भुमापन कार्यालय औरंगाबाद अर्ज केला होता. तक्रारदार यांच्या अर्जानुसार फेरफार उताराचे काम करुन देण्यासाठी श्रीमती सुनिता सुदामराव पोफळे, परिरक्षन भुमापक, नगर भुमापन कार्यालय, औरंगाबाद यांनी ३,०००/- रुपयाची तक्रारदार यांच्याकडे मागणी केली. तेव्हा तक्रारदार यांची श्रीमती सुनिता सुदामराव पोफळे, परिरक्षन भुमापक, नगर भुमापन कार्यालय, औरंगाबाद यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद येथे तक्रार नोंदविली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने आज दिनांक १७/०७/२०१८ रोजी श्रीमती सुनिता सुदामराव पोफळे, परिरक्षन भुमापक, नगर भुमापन कार्यालय, औरंगाबाद यांच्याकडे पंच साक्षीदारा समक्ष लाचेची मागणीची पडताळणी केली असता, तक्रारदार यांच्याकडे श्रीमती सुनिता सुदामराव पोफळे, परिरक्षन भुमापक यांनी ३,०००/- रुपये लाचेची मागणी करून ती लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केले. त्यावरुन आज दि.१७/०७/२०१८ रोजी लाचेचा सापळा आयोजित करण्यात आला असता, श्रीमती सुनिता सुदामराव पोफळे, परिरक्षन भुमापक, नगर भुमापन कार्यालय, औरंगाबाद यांनी पंच साक्षीदारा समक्ष ३,०००/- रुपये लाचेची रक्कम नगर भुमापन कार्यालय, औरंगाबाद येथे त्यांच्या टेबलजवळ स्विकारल्यानंतर त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

तक्रारदार यांच्याप्रमाणे नागरीकांनी भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद यांनी केले आहे.

फोन क्रं. ०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्रं. १०६४
Mail ID :-१) dyspacbaurangabad@mahapolice.gov.in, २) dyspacbabad@gmail.com.

पोलीस उप अधीक्षक कार्यालय अँन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद
सत्यमेव जयते

(वर्षाराणी पाटील)
पोलीस उप अधिक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद.